# छंद पुष्परचनेचा - ८


५०० वर्षांपूर्वी जेव्हा इकेबाना स्कूलची सुरुवात झाली तेव्हा रिक्का रचना प्रथम केल्या गेल्या. या रचना आकाराने खूप मोठ्या असत. विविध प्रकारची पाने, फुले, फांद्या यांची मांडणी करून या रचना साकारल्या जातात. जपानी लोकांची पुष्परचना करण्याची आवड वाढू लागली व पुढे जपानमध्ये झपाट्याने पसरली. जपानमध्ये बहुतेक सर्व घरांमध्ये पुष्परचना ठेवण्यासाठी मुद्दाम जागेचे नियोजन केलेले असते. फक्त जपानी महिलाच ही कला जोपासतात असे नाही तर पुरुषही या कलेमध्ये तरबेज आहेत.

शोका रचनांप्रमाणे रिक्का रचनांचेही दोन प्रकार आहेत. रिक्का शोफुताई व रिक्का शिंपूताई !

रिक्का शोफुताई म्हणजे परंपरागत चालत आलेली रचना. ज्यामध्ये ठराविक नियमानुसार अतिशय रेखीव अशी रचना केली जाते. रिक्का शिंपूताई रचनेमध्ये नियम थोडे शिथिल करुन रचनाकाराला त्याच्या मनाप्रमाणे लावण्याचे स्वातंत्र मिळते.

रिक्का शोफुताई (फोटो १) - या रचना लावताना एकूण सात किंवा नऊ प्रकारचे वेगवेगळे मटेरिअल वापरावे लागते. मटेरिअल सात/नऊ वेगवेगळ्या पातळी (लेव्हल्स) वर लावले जाते. या सात पातळ्यांची नावे पुढीलप्रमाणे - १)शिन, २) शोशिन, ३) सोय, ४) मिकोशी, ५) उके, ६) हिकाई, ७) नागाशी

रिक्का रचनेची उंची साधारण एक ते दीड मीटर एवढी असते. यासाठी वापरावयाचे पुष्पपात्र हे उंच व तोंड मोठे असलेले असते. पुष्परचना जाड व मोठा पीन होल्डर वापरुन करतात. रिक्का रचना करताना अनेक प्रकारचे मटेरिअल हाताळावे लागते. त्यामुळे कोणते पान किंवा फूल कोठे, कसे वापरायचे, त्याची रंगसंगती कशी साधायची याचे नियोजन आधी करावे लागते. फांद्या वाकवण्यासाठी तारा तसेच धातूचे कोन यांचा वापर केला जातो. फांद्या वाकवण्याचे तंत्र आधी मुद्दाम वेळ देऊन शिकून सराव करावा लागतो.




शेजारील आकृतीमध्ये वर उल्लेख केलेल्या सात लेव्हल्समध्ये फांद्या अथवा फुले लावली आहेत. यामध्ये जांभळ्या रंगाचे आयरीस, त्याची पाने, गवताची पाने, पिवळे फूल असे सात प्रकारचे मटेरियल वापरले आहे. यात मिझुगिवा म्हणजे पुष्परचनेचा सर्वात खालचा भाग जो खोडाप्रमाणे दिसतो त्याला 'डि' असे म्हणतात. ही रचना करायला साधारण एक ते दोन तास लागतात.

रिक्का शिंपूताई (फोटो २) या रचना थोड्याशा मुक्त रचनांकडे झुकणाऱ्या आहेत. त्यासाठी सुद्धा पुष्पपात्र /वाजेस मिळतात. शिंपूताई रिक्का रचना करताना लाईन व मास यातील विरोधाभास विरूद्ध दिशेने दाखविला जातो. या रचनेमध्ये सर्व बाजूंनी (३६०डिगरी) फुले, पाने, फांद्या लावल्या जातात. रचनेच्या मध्यभागी शोशिन फांदी असते. रचना करताना फुले, पाने, फांद्या किती उंचीच्या, कशा व किती लावायच्या हे रचनाकाराच्या आवडीनुसार ठरते. शोका रचनांप्रमाणे यातही मिझुगिवा (डी) महत्वाचा आहे. या रचनांचा आकार रचनाकाराच्या आवडीनुसार लहान अथवा मोठा असू शकतो.

शेजारील शिंपूताई रिक्कामध्ये बर्ड ऑफ पॅरेडाईस व त्याची मोठी दोन पाने याने मास इफेक्ट दाखविला आहे तर वळणदार फांदीने लाईन इफेक्ट दाखविला आहे. पुष्परचनेच्या बेसला त्याचे सौंदर्य वाढविणारी फुले व पाने लावली आहेत.



फोटो २

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

**(मराठी विश्व, न्यूजर्सी यांच्या सौजन्याने)**

**इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर**

**asdssd@gmail.com**